REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ३१ मार्च १९४८ | अंक १२

नवीन पुष्कळ निघाले, तरी

## तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

## सारस्वत

### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५ ३१-१-१९४८

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,११,००० |
| ठेवी ... | रु. ७६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८३,५०,००० |

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

## मुदलियार अँड मुदलियार

### बिझिनेस व सेल्स ऑर्गनायझर्स

११५४ शंकरशेट रोड, पुणें २.

आम्ही कोणत्याही मालाचा उठाव तूर्त महाराष्ट्र आणि कर्नाटक करितां गॅरंटीनें करून देऊं. सध्या डॉ. गोंवडे ज्वर-बिंदू डेपो व मॉर लॅबोरेटरीज यांचें काम आम्हीं हातीं घेत आहोंत. चलाख व होतकरू तरुणांना आम्हीं कॅनव्हसिंगचें शिक्षण देऊन तयार करणार आहोंत.

### दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

### दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# विविध माहिती

**जपानी मालांची खरेदी**—ब्रिटिश सरकारचे परदेशीय व्यापाराचे मंत्री ह्यांनीं नुकतीच अशी माहिती सांगितली कीं, ब्रिटन जपानकडून मालाची खरेदी करीत आहे. उलट, जपानला कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री देण्याचें ब्रिटननें कबूल केलेलें नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें.

**मुंबई सरकारची दारूबंदी**—संपूर्ण दारूबंदीच्या धोरणास अनुसरून मुंबई सरकारनें प्रांतांतील १३५ दारूचे गुत्ते बंद करण्याला मंजुरी दिली आहे. १९४५-४६ च्या मानानें येत्या वर्षी देशी दारूचा खप निम्यावर येईल आणि विदेशी दारूचा खप २५% नें कमी होईल.

**अजूनहि अमेरिकन मालाची रशियाकडे निर्गत कां?**—"रशिया हा सध्यां दोस्त राष्ट्र आहे म्हणून अमेरिकेनें कांहीं मालाची रशियाकडे निर्गत चालू दिली आहे. हा माल रशियानें दोन वर्षांपूर्वी मागविलेला होता" अशी माहिती प्रे. ट्रुमन ह्यांनीं सांगितली.

**ब्रिटिश हिंदुस्थानांतील नफा व संस्थानांतील नुकसानी**—श्री. मथुरावाला हे हिंदी प्रजानन असून त्यांना त्यांच्या हिंदुस्थानांतील धंद्यांत नफा झाला तरी संस्थानी हद्दींतील धंद्यांत नुकसानी आली. इनकमटॅक्सची आकारणी करतांना ही नुकसानी हिशेबांत घेऊनच नफ्याची रक्कम निश्चित केली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. हें प्रकरण मुंबई हायकोर्टापर्यंत गेलें, तेथें त्यांचें म्हणणें मान्य झालें.

**प्रांतिक सहकारी परिषद्**—मुंबई प्रांतिक सहकारी परिषद् मुंबई येथें ता. १२ व १३ एप्रिल ह्या दिवशीं भरणार आहे. सर व्ही. टी कृष्णमाचारी हे अध्यक्षस्थान स्वीकारतील. मुंबईचे पंतप्रधान श्री. खेर हे परिषदेचें उद्घाटन करणार आहेत.

**माथेरान रेल्वे**—ता. १ एप्रिल १९४८ पासून माथेरान लाइट रेल्वे हिंदुस्थान सरकारची होण्याचें ठरलें आहे, असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**पाकिस्तान हिंदी कापड घेणार**—हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांच्यांत कापडाच्या १ लक्ष, २० हजार गांसड्या देऊन २ लाख गांसड्या कापूस घेण्याचा करार झाला आहे. ह्या करारास अनुसरून पाकिस्तान सरकार हिंदुस्थानकडून जाडेंभरडें कापड घेणार असल्याचें समजतें.

**हिंदुस्थानसाठी सिंधचा तांदूळ**—पाकिस्तान व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान एक करार झाला असून त्याअन्वयें मका व गहूं ह्यांच्या बदली २४,००० टन सिंधी तांदूळ हिंदुस्थानला मिळणार आहे. हिंदुस्थान ९,००० टन गहूं देऊन तितकाच तांदूळ घेणार आहे, आणि १९,००० टन मका देऊन १६,००० टन तांदूळ घेणार आहे.

**पाकिस्तान व रिझर्व्ह बँक**—पाकिस्तान सरकारनें विनंती केल्यावरून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआनें ता. ३० जून १९४८ पर्यंत पाकिस्तानांत पूर्वीप्रमाणेंच काम करण्याचें कबूल केलें आहे. रिझर्व्ह बँकेनें, पाकिस्तान सरकारच्या प्रांतांतून १ एप्रिल १९४८ पासून आपलें कार्य पूर्णपणें बंद करावें अशी इच्छा पाकिस्तान सरकारनें प्रथम व्यक्त केली होती. म्हणजे ह्या तारखेपासून पाकिस्तान सरकारची बँक म्हणून रिझर्व्ह बँकेनें काम करण्याचें बंद करावयाचें होतें.

**खतें वाढविण्यासाठी कमिटी**—हिंदुस्थानांतील सध्यांची अन्नधान्याची परिस्थिती लक्षांत घेतां, जमिनीला जास्तींत जास्त खत मिळण्याची आवश्यकता आहे. देशांतील खतांच्या पुरवठ्यांत सुधारणा करण्यासाठी हिंदी सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीचे अध्यक्षस्थान अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं स्वीकारलें आहे.

**मद्रास प्रांतांत ग्रामोद्योग केंद्रें**—मद्रास प्रांतांतील कांहीं निवडक खेड्यांतून ग्रामोद्योगांचीं प्रात्यक्षिकें करून दाखविणारीं केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. ह्या केंद्रांत लोहारकाम, होड्या बांधणें व मातीचीं भांडीं तयार करणें ह्या ग्रामोद्योगांचा समावेश करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानच्या नव्या नोटा**—पाकिस्तान सरकारनें 'पाकिस्तान सरकार' अशीं इंग्लिश व उर्दू अक्षरें असणाऱ्या नव्या नोटा काढण्याचें ठरविलें आहे. तथापि ह्या नोटा हिंदुस्थानांतील रिझर्व्ह बँक अगर तिच्या शाखा ह्यांत कायदेशीर चलन म्हणून स्वीकारण्यांत येणार नाहींत असें जाहीर करण्यांत आलें आहे. रिझर्व्ह बँकेच्या २, ५ व १०० नोटांच्या आकाराच्या वरीलप्रमाणें नोटा पाकिस्तान सरकार ता. १ एप्रिल १९४८ पासून काढणार आहे. पाकिस्तानमध्यें हिंदी चलनी नोटा ता. ३० सप्टेंबर १९४८ पर्यंतच कायदेशीर चलन म्हणून स्वीकारण्यांत येणार आहेत.


# NOTICE

**The Bharat Industrial Bank, Ltd., Poona.**

Notice is hereby given that the 10th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank, Ltd., Poona will be held on Sunday the 11th April 1948 at the Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 5 P. M. to transact the following business.

1. To receive and consider the Report of the Directors, Audited Balance Sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1947.

*2. To declare devidend on 6% C. R. P. shares.

3. To Elect Directors in places of the retiring Directors who are eligible for reelection.

4. To appoint Auditors and fix up their remuneration.

5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,

Poona 24th March 1948 — **N. N. Kshirsagar,**
15, Shukrawar Peth, Poona 2. — **R. B. Salvekar,**
Managing Directors.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 5th April to 20th April 1948 both days inclusive.

* The dividend when sanctioned will be payable on and after 1st May 1948. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Shareholders.

# अर्थ

बुधवार, ता. ३१ मार्च १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

**श्रीपाद वामन काळे**

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंद निर्गत-व्यापाऱ्याचें धोरण

युद्धोत्तर काळांतील हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराकडे लक्ष दिलें असतां आपल्या व्यापारांत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झालेले दिसतात. युद्ध-काळांत आपली निर्यात फार मोठ्या प्रमाणावर होऊन,हिंदुस्थान युद्ध-कालीन व्यापारी देण्याघेण्याच्या हिशेबाअखेर धनको देश बनला. परंतु युद्धोत्तर काळांत विशेषत: अन्नटंचाईच्या बिकट प्रश्नामुळें व परदेशांतून आयात होणाऱ्या कांहीं भांडवली व चैनीच्या मालामुळें आपला देश परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत दाखवूं लागला आहे. ही परिस्थिति आपल्या तत्कालीन व कायमच्या आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें समाधानकारक नाहीं. हिंद सरकारच्या अंदाजपत्रकांत अर्थमंत्र्यांचें लक्ष त्या प्रश्नाकडे गेलेलें स्पष्टपणें दिसलें, परंतु ह्या परिस्थितीवर उपाययोजना सुचविलेली दिसत नाहीं. नाहीं म्हणावयाला गेल्या वर्षापासून सरकारनें आयातीवर निर्बंध घातले आहेत व अगदीं आवश्यक एवढाच माल आयात केला गेल्यास परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत थोडीशी घटेल हें संभवनीय आहे. परंतु ह्याचबरोबर आपलें निर्गत व्यापाराचें धोरण सुधारतां येईल का, याबद्दल दूरवर विचार करून उपाययोजना ठरविणें आवश्यक आहे. सध्यां ( व पूर्वींहि ) आपला निर्गत व्यापार पूर्णपणें खाजगी व्यापाऱ्यांच्या हातांत आहे. सरकारच्या निर्यातीवरील जकातींच्या धोरणामुळें त्या व्यापारावर साहाजिकरीत्या जो कांहीं परिणाम होत असेल तेवढाच. परंतु सरकारी धोरणामुळें निर्गत व्यापाराच्या परिस्थितींत कांहीं विशेष फरक अद्यापपावेतो पडला आहे असें म्हणतां येत नाहीं. या ठिकाणीं विचार करण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे, निर्गत व्यापार परतंत्र राजकीय परिस्थितींत अगदी अनिर्बंध ठेवण्यांत आला होता. निर्गत व्यापारावर कस्टमच्या जकाती ह्या अगदीं अल्प प्रमाणांतच असत, ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. यंदा मात्र मॅंगेनीज़, तेल बिया इ. च्या निर्यातीवर स्वतंत्र हिंद सरकारनें उत्पन्नाच्या दृष्टीनें विशेष जकात लादलेली आढळते.

आपलें कच्च्या मालाचें किंवा इतर किरकोळ वस्तूंचें उत्पादन अगदीं बेताचें आहे. परंतु कांहीं प्रकारचा माल जागतिक बाजारपेठेंत चटकन नजरेस भरेल अशा स्वरूपाचा आहे. उ. चहा, गालिचे,काजूबिया, किरकोळ हस्तव्यवसायाच्या कलाकौशल्याच्या वस्तू, कच्चें कातडें, तेलबिया, अभ्रक, मॅंगेनीज्, मिरी, काथ्या इ. अशा पदार्थांना किंवा वस्तूंना जागतिक बाजारपेठेंत मागणी असते. परंतु निश्चित रीतीनें बाजारपेठा शोधून काढण्याचे प्रयत्न अद्याप केले गेले नाहींत, व अशा संभाव्य बाजारपेठांतून हिंदच्या मालाचा विक्रीच्या दृष्टीनें प्रचार फारसा करण्यांत आलेला नाहीं. हिंदचे व्यापारी कमिशनर्स अलिकडे ऑस्ट्रेलिया, सीलोन, कॅनडा, अमेरिका इ. देशांतून आहेत. हे व्यापारी कमिशनर्स अहवाल किंवा माहिती पत्रकें प्रसिद्ध करतात. ट्रेड कमिशनर्सचे अहवाल व हिंदचे निर्गत-मालाचे व्यापारी यांच्यामध्यें कांहीं तरी प्रत्यक्ष निश्चितपणाचा संबंध आला पाहिजे; तरच आपला परराष्ट्रीय व्यापार आकारानें वाढूं शकेल, त्यांत विविधता निर्माण होईल, व महायुद्धानंतरच्या बदललेल्या राजकीय व आर्थिक वातावरणांत कदाचित नवीन बाजारपेठा शोधून काढतां येतील. सरकारचें अद्यापपर्यंतचें धोरण आयातीवरील नियंत्रणांचें आहे. तें चालू ठेऊन त्याच्या जोडीला निर्यात व्यापाराचें कांहीं तरी निश्चित धोरण स्वातंत्र्याच्या आजच्या काळांत, कारखानदार व व्यापारी यांच्याशीं सहकार्य करून सरकारला आंखतां येण्यासारखें आहे असें वाटतें. खुद्द इंग्लंड, आर्थिक दृष्ट्या उच्च पदावर असणारी अमेरिका व रशिया यांचेंहि धोरण अगदीं अलिकडच्या काळांतील, आपली व्यापारी निर्गत वाढविण्याचेंच आहे. हिंद सरकारला कांहीं प्रमाणांत अमेरिका, कॅनडा, इंग्लंड यांच्याशीं निर्गत व्यापार वाढविता येईल, त्याचप्रमाणें आशिया व आफ्रिका या खंडांतील कांहीं गरजू देशांशीं संशोधन व पाहाणी करून निर्गत व्यापार वाढवितां येणें शक्य आहे. अमेरिकेचे डॉ. ग्रेडी यानीं नुकतेंच मार्शल योजनेनुसार आशियाटिक राष्ट्रांसाठी एखादी 'नेहरू-योजना' असावी असें मत व्यक्त केलें त्याच्या बुडाशीं आजच्या आशिया खंडाच्या आर्थिक परिस्थितींत बराच अर्थ आहे असें वाटतें.

दुसरें महायुद्ध चालूं असतांना यु.किं.क.कॉ. सारख्या सरकारी व्यापारी संस्थेनें हिंदुस्थानांतून ब्रिटनसाठी फार मोठ्या प्रमाणांत मालाची निर्गत केली. त्याच पद्धतीवर आज शांततेच्या काळांत स्वतंत्र हिंद सरकारनें हिंदच्या मालासाठी जागतिक बाजारपेठा हुडकून काढण्याचा प्रयत्न करावा, व अशा प्रयत्नांत व्यापारी व कारखानदार यांच्याशीं सहकार्य करण्यांत यावें. असें केलें असतां हिंदच्या निर्गत मालाला जास्त प्रमाणांत क्षेत्र मिळूं शकेल व सध्यां आपणाला आवश्यक असें दुर्मिळ चलनहि उपलब्ध होऊं शकेल. अशा धोरणानें परराष्ट्रीय व्यापाराचें राष्ट्रीयीकरण होणार नाहीं; सरकार व खाजगी निर्गत व्यापारी यांच्यामध्यें परराष्ट्रांतील बाजारपेठा शोधून काढण्याच्या दृष्टीनें, व तेथें विक्रीक्षेत्र वाढविण्याच्या बाबतींत एकवाक्यता होईल व प्रगति जास्त वेगानें होईल एवढेंच. पाकिस्तानहि आतां व्यापारासाठी परदेशच आहे. तेव्हां त्याहि देशांत निश्चितपणें कोणती निर्गत करतां येईल याबद्दल धोरण व प्रयत्न यांची एकवाक्यता झाली पाहिजे. स्वयंपूर्णता आपणाला तूर्त तरी शक्य नाहीं व आपल्या आर्थिक जीवनाची मदार आयात व निर्गत यांवरच अवलंबून रहाणार आहे. तेव्हां निर्गत वाढविण्यासाठी सरकार, कारखानदार व व्यापारी यांचे एकवाक्यतेनें प्रयत्न झाले पाहिजेत.

---

**बँक ऑफ इंडियाची भांडवल वाढ**—बँक ऑफ इंडियाच्या डायरेक्टरांनीं बँकेचें वसूल भांडवल ५० लक्ष रुपयांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. त्यासाठीं प्रत्येकी १०० रुपयांचे १,००,००० शेअर्स विक्रीस काढण्यांत येतील. प्रत्येक शेअर १५० रुपयांस म्हणजे ५० रु. वाढाव्यानें विकला जाईल. वाढाव्याची रक्कम रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येईल. ह्या भांडवल वाढीस सरकारी परवानगी द्यावी लागेल.

# स्फुट विचार

## वारसा कराची योजना

राष्ट्रांतील संपत्तीची सामाजिक दृष्ट्या अधिक न्याय्य वांटणी करण्याच्या हेतूनें हिंदी संघराज्याच्या मध्यवर्ती कायदे मंडळांत वारसा कराची योजना आखणारें बिल नुकतेंच प्रविष्ट करण्यांत आलें. बिगर शेतकी उत्पन्नावर हिंदुस्थानांतील प्रांतांना कर वसूल करतां यावा असा बिलाचा उद्देश असून, ह्या नव्या उत्पन्नाचा विनियोग प्रांतांच्या औद्योगिक पुनर्घटनेच्या कार्याकडे करावयाचा आहे. शेतीची जमीन सोडून इतर सर्व प्रकारच्या मालमत्तेवर मुदली किंमतीच्या अनुरोधानें हा कर बसविण्यांत यावयाचा आहे. कराचा दर कोणता असावा ह्याचा विचार बिलांत करण्यांत आलेला नाहीं. त्यासाठीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें कायदे करण्यांत यावयाचे आहेत. ज्या मालमत्तेची मुद्दली किंमत एक लाखापेक्षां अधिक नसेल त्यावर मात्र हा कर घेण्यांत येणार नाहीं.

दोन वर्षांपूर्वी ह्याच तऱ्हेचें एक बिल मध्यवर्ती कायदे-मंडळांत मांडण्यांत आलें होतें. परंतु राज्यघटनात्मक बदलामुळें तें तसेंच पडून राहिलें. बिलांतील कर-आकारणीचीं कलमें लक्षांत घेतलीं तर हें बिल इंग्लंडमधील एस्टेट ड्यूटी बिलाच्या धर्तीवर असल्याचें दिसून येईल. ह्या बाबतींत सरकारची भूमिका अशी आहे कीं, एखाद्या मयत नागरिकाच्या संचित मालमत्तेंतील कांहीं भाग घेण्याचा राज्यसत्तेला अधिकार आहे आणि मयताच्या वारसाच्या हक्काच्या आधीं हा हक्क सरकारचा आहे. ह्या करापासून उत्पन्न होणारा पैसा निरनिराळ्या प्रांतांना कसा वाटावा हा प्रश्न वेगळा असून त्याचें निश्चित उत्तर बिलांत देण्यांत आलेलें नाहीं. बिलाच्या उद्देशाची जी प्रस्तावना आहे तींत ह्यासंबंधीं एवढेंच म्हटलें आहे कीं, कर वसूल करण्याचा खर्च वजा जातां उरलेला पैसा प्रांतांशींच विचारविनिमय करून वाटण्यांत यावयाचा आहे.

## नाशिक येथील दारूच्या कारखान्याचा नवा उपयोग

मुंबई प्रांताचे पुनर्घटना मंत्री श्री. एल्. एम्. पाटील ह्यांनीं विधिमंडळांत नुकतीच अशी माहिती सांगितली कीं, नाशिक येथील सरकारी दारू गाळण्याच्या कारखान्यांत पॉवर अल्कोहल तयार करण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. सध्या ह्या कारखान्यांत कांहीं प्रमाणांत स्पिरिट आणि कांहीं प्रमाणांत दारू गाळण्यांत येत असते. मुंबई प्रांतांत संपूर्ण दारूबंदी झाली म्हणजे ह्या कारखान्याचा दुसरा उपयोग करून घेणें अपरिहार्यच होणार आहे. युद्धापूर्वी हा कारखाना १ लाख ६० हजार गॅलन दारू गाळूं शकत असे. पण प्रत्यक्ष उत्पादन १लाख ३० हजार गॅलनच्या पेक्षा अधिक फारसें झालें नाहीं. दारू गाळण्याच्या कामीं कारखान्याचा पूर्ण उपयोग झाला नसला तरी पॉवर अल्कोहल तयार करण्यासाठीं तसा उपयोग करून घेण्यास कोणतीही हरकत असण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांतून हजारों टन उसाच्या रसाची मळी वाया जाते. ह्या कारखान्यांतून दरवर्षी सुमारें २० हजार टन मळी पॉवर अलकोहल तयार करण्यासाठीं मिळूं शकेल असा अंदाज आहे. ह्या मळीपासून १० लक्ष ८० हजार गॅलन स्पिरिट निघूं शकेल. हें स्पिरिट एकास १० ह्या प्रमाणांत पेट्रोल-मध्यें मिसळलें असतां ११ लाख गॅलन मोटारीच्या जळणाचें तेल मुंबई प्रांताला मिळूं शकेल. १९३८ सालीं मुंबई प्रांतांतील २० जिल्ह्यांना मिळून ८५ लाख गॅलन पेट्रोल मोटारीसाठीं लागलें असावें असा अंदाज आहे. ह्या अंदाजांत संस्थानांना लागणारें व १९३८ नंतर वाढत्या प्रमाणांत लागणारें पेट्रोल ह्यांचा समावेश केलेला नाहीं. हा हिशोब केला तर मुंबई प्रांताला १ कोटी गॅलन पेट्रोलची जरूर लागेल असें वाटतें. ह्यावरून मुंबई प्रांतांत पुरेसें पॉवर अल्कोहल तयार होण्याची शक्यता नाहीं असें उघडच दिसतें. अशा परिस्थितींत नाशिक येथील कारखाना तर नीट चालेलच; परंतु महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांनाही ह्या कारखान्याच्या अनुभवाचा फायदा मिळून त्यांच्या पुढील एक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

## रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण अकालीं

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख ह्यांचे पुणें येथें नुकतेंच एक भाषण झालें. रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा विचार अकालीं आहे; सध्याच्या देशांतील आर्थिक परिस्थितीचा विचार करता तसें करण्याची गरज नाहीं आणि बँकेचें बोर्डही ह्या विचाराला अनकूल नाहीं असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. ते पुढें असे म्हणाले कीं, सरकारचा वरील विचार ठामच झालेला असेल तर अर्थातच राष्ट्रीयीकरणाची योजना तयार करण्याच्या कामांत बँक सहकार्य करण्यास तयार आहे. तथापि, बँकेच्या घटनेच्या तात्विक प्रश्नापेक्षां सरकारचे फडणिशी खातें आणि रिझर्व्ह बँक ह्यांचे अधिक निकट सहकार्य घडवून आणण्याचा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. इंटर नॅशनल मॉनेटरी फंड आणि इंटरनॅशनल बँक ह्यांच्या मदतीचा फायदा घेण्याचा प्रसंग ह्या वर्षीं हिंदुस्थानवर येण्याचा संभव आहे असेंही त्यांनीं ध्वनित केलें.

हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील पौंडी शिलकेबद्दल बोलतांना ते म्हणाले " युद्ध सुरू झाल्यावरोबर हिंदुस्थानची ही शिल्लक आणि देशांतील अफाट चलन-विस्तार ह्याकडे रिझर्व्ह बँकेनें लक्ष देण्यास सुरवात केली. फेब्रुआरी १९४३ मध्यें ह्या प्रश्नाकडे हिंदुस्थान सरकारचं लक्ष वेधण्यांत आलें. हिंदुस्थानची पौंडी शिल्लक सुरक्षित राखण्याविषयीं आणि युद्धोत्तर तिचा हिंदुस्थानला उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें कांहीं शिफारसीही करण्यांत आल्या. तथापि, सरकारनें ह्या गंभीर स्वरूपाच्या प्रश्नाचें महत्व ओळखावें तसें ओळखलें नाहीं असें दिसतें. १९४४ सालीं बँकेनें सरकारला पुन्हां असा सल्ला दिला कीं, देशांत कच्चा माल आणि आवश्यक असा पक्का माल ह्यांची टंचाई आहे,तेव्हां सरकारनें ह्या मालाची निर्यात थांबवावी. हिंदुस्थान सरकारला हिंदुस्थानांतील खर्च चालविण्या-साठीं जो पैसा लागतो तो सोनें व चांदी विकून उभारण्यांत यावा; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत योग्य भावानें भांडवली मालाची आयात करण्यांत यावी असेंही सुचविण्यांत आलें. युद्ध संपल्यानंतर सुद्धा इंग्लंडमध्यें पौंडी शिल्लक हिशेबीं सांचत चालली होती. त्याबद्दल चिंता व्यक्त करणारा ठरावही बँकेच्या बोर्डानें १९४६ सालीं केला. ह्या ठरावांत असें सुचविण्यांत आलें होतें कीं, ह्यापुढील हिंदुस्थान सरकारचा रुपयांतील खर्च अनिर्बंध परकीय हुंडणावळीच्या बदला करण्यांत यावा; किंवा त्याच्या बदली भांडवली माल अगर हिंदु-स्थानला जरूर असणारा चरितार्थाचा माल आयात करण्यांत यावा. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांचा जो डॉलर-निधि उभारण्यांत आला होता त्यावरील बंधनें रद्द करून तो खुला करण्याबद्दल बँकेनें विशेष आग्रह धरला,त्याचा परिणाम होऊन हिंदुस्थानची डॉलर्सची गरज विशेषत्वानें लक्षांत घेण्यांत येईल असें आश्वासन ब्रिटनकडून मिळालें. ह्या सर्व घडामोडींचा विचार करतां, हिंदुस्थानला आपल्या गरजा आपल्या पौंडी शिलकेंतून भागविण्याचा हक्क आहे हें उघडच आहे. तथापि पौंडी शिल्लक परत मिळण्याच्या बाबतींत हिंदुस्थाननेंही योग्य तो संयम पाळणें जरूर आहे."

## नैसर्गिक रबर विरुद्ध कृत्रिम रबर

### अमेरिकेचें वरचढ स्थान

नैसर्गिक रबराचें उत्पादन ब्रिटिश साम्राज्यांत केंद्रीभूत असल्याकारणानें, त्यास डॉलर मिळवून देणाऱ्या जिनसांत रबरास महत्त्वाचें स्थान आहे. रबराचें उत्पादन मलाया, ने. ई. इंडीज, सयाम, इंडोचायना, सिलोन, इत्यादि देशांत मुख्यत्वेंकरून होतें; परंतु त्याची मुख्य बाजार पेठ अमेरिका ही आहे. १९४७ सालीं जगांत एकूण जेवढें रबर निर्माण झालें, त्याच्या ४९% रबर (३,९७,००० टन) एकट्या अमेरिकेनें घेतलें. ह्याच वर्षी अमेरिकन कारखान्यांनीं ४,३२,००० टन कृत्रिम रबर व २,१३,००० टन पुनर्घटित (रीक्लेम्ड) रबर वापरलें. नैसर्गिक रबराचा वापर अमेरिकेंत वाढत असला, तरी बाजारांत टिकाव धरूं शकेल अशा किंमतीस तें मिळत राहिलें तरच ही प्रवृत्ति कायम राहील हें उघड आहे; परंतु नैसर्गिक रबराच्या उत्पादनाचा खर्च वाढला आहे. मलायामधील रबराचीं बहुसंख्य झाडें आतां जुनीं झाली आहेत. एकूण झाडांपैकीं तिसरा हिस्सा झाडें २१ वर्षांपेक्षां जुनी आहेत, आणि तींहि पुष्कळ रबर देणाऱ्या जातींचीं नाहींत. रबराचें झाड त्याच्या १३ व्या ते १७ व्या वर्षांचें दरम्यान भरपूर रबर देतें; त्यानंतर त्याचें उत्पादन घटूं लागतें. जपानी आक्रमणामुळें मध्यंतरीं नवीं झाडें लावलीं गेलीं नाहींत. तांदुळाचा तुटवडा व चलनवृद्धीचे दुष्परिणाम ह्यांमुळें मलायामधील मजुरीहि वाढली आहे; त्यामुळें उत्पादन खर्चांत भर पडली आहे. अमेरिकेंत नैसर्गिक रबराचा खप व्हावयाचा असेल तर कृत्रिम रबरापेक्षां तें स्वस्त पडलें पाहिजे; नाहींतर अमेरिकेंतील कृत्रिम रबराचें उत्पादन वाढत जाणार हें स्पष्ट आहे. नैसर्गिक रबरास अमेरिकेंत वाव रहावा अशी ब्रिटिश सरकारची इच्छा आहे, कारण अमेरिकेची बाजारपेठ बुडाली तर डॉलर्स मिळविण्याचें साधन नष्ट तर होईलच, परंतु रबराच्या मळ्यांचा धंदाच कायमचा संकटांत येईल. तेव्हां, तात्कालिक उपाय योजना म्हणून अमेरिकेचें मन वळविण्याचा प्रयत्न करणें अगत्याचें असलें, तरी नैसर्गिक विरुद्ध कृत्रिम रबर ह्या चढाओढींत नैसर्गिक रबर कसें टिकाव धरून राहूं शकेल, हा दूरगामी महत्त्वाचा मुद्दा आहे. रबरास अमेरिकेंत प्रवेश मिळविण्याचें कामीं जिनीव्हा येथील चर्चेनें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांना बऱ्याच सवलती मिळवून दिल्या असा समज होता, परंतु सवलतींची प्रत्यक्ष शब्दयोजना पाहिल्यानंतर ह्या सवलतींचा पोकळपणा स्पष्ट झाला आहे. त्यामुळें मळेवाले आतां जागे झाले असून ते ब्रिटिश सरकारवर वजन आणूं लागले आहेत.

### दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

वरील बँकेनें १९४७ सालीं १,२७,८८२ रु. व्याज, २०,१३० रु. कमिशन वगैरे आणि ५,४७६ रु. रोखे विक्रींत नफा मिळवून ८३,६३८ रु. व्याज दिलें. पगार व अलावन्ससाठी ५३,३२५ रु. खर्च आला, आणि निवळ नफा ३,५७७ रु. राहिला. "बँकेच्या एका कचेरींत अहवालाचे वर्षी चोरी झाली. तिच्या चौकशीचें काम पोलीस अधिकारी करीत आहे. चोरीची रकम ४२,००० रु. वर आहे आणि त्याची पूर्ण तरतूद ताळेबंदांत केलेली आहे." त्यामुळेंच नफ्याचा आकडा लहान दिसतो; गेल्या वर्षी नफा वाटणीस १३,४७१ रु. आले होते. १९४७ च्या नफ्यांतून कंपनी कायद्याप्रमाणें १,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले आहेत. ६% क्यु. प्रे. भागीदारांना १९४७ चें डिव्हिडंड देण्यास १६३० रु. लागतील. २,३६४ रु. नफा पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल. बँकेची वार्षिक सभा एप्रिल ११ रोजीं आहे.

### हिंदी साखर कारखान्यांस संरक्षण

श्री. संपादक "अर्थ", यांस वि. वि.

दक्षिणेंतील साखरेच्या कारखान्यांना भरमसाठ फायदा होत आहे. स्वतःची जमीन सर्व कारखान्यांची आहे. इतर ठिकाणचे कारखाने शेतकऱ्यांच्या उसावर अवलंबून असतात. शेतकऱ्यांना परवडत नाहीं म्हणून सरकारनें जास्त भाव वाढवून दिले. खरोखर दक्षिणेंतील कारखान्यांना भाव वाढवून देण्याची जरूरी नव्हती, कारण त्यांचा स्वतःचा ऊंस असतो. शेतकऱ्यांकडून ते ऊंस विकत घेत नाहींत, पण त्यांना वगळलेले नाहीं. यामुळें या वाढत्या भावाचा फायदा त्यांना मिळत आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

बुधवार ता. २४।३।४८ च्या टाइम्सप्रमाणें, मि. आयंगार यांनीं हिंदी पार्लमेंटमध्यें साखरेच्या कारखान्यांना संरक्षण देण्याची जरूरा नाहीं म्हणून सांगितलें; कारण इतकीं वर्षे झालीं तरी अद्याप हे कारखाने आपल्या पायावर उभे राहिले नाहींत, कारखान्यांत सुधारणा नाहीं. त्यानीं असें सांगितलें कीं कलकत्त्यांत क्यूबाची साखर १३ रुपये मण मिळते व देशी साखर ४० रुपये मण विकली जाते. यावरून आपण किती मागें आहों हेंच सिद्ध होतें.

साखरेच्या कारखान्यांस एक वर्ष संरक्षण सरकारनें दिलें आहे. पण हा सर्व बोजा जनतेवर पडतो हें लक्षांत घेणें जरूर आहे. सर्व साखर कारखान्यांनीं अशास्त्रीय व घमेंडखोर वृत्ति टाकून दिली पाहिजे.

३७४, शुक्रवार, पुणें २ के. बी. भागवत, बी. एजी.

### हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध प्रकाशक
### मॅकमिलन आणि कं. लि.

डॅनिअल आणि ॲलेक्झँडर मॅकमिलन ह्यांनीं १८४३ सालीं स्थापन केलेला पुस्तकाचा हा धंदा आतां लंडन, न्यूयॉर्क, टोरंटो, मुंबई, कलकत्ता, मद्रास व मेलबर्न ह्या ठिकाणच्या कचेऱ्यांतून चालविला जातो. इंग्लंडमध्यें तयार झालेल्या पुस्तकांस हिंदुस्थानांत मोठी मागणी आहे हें पाहून १८७५ सालीं हिंदी विद्यार्थ्यांसाठी खास अशीं शालेय क्रमिक पुस्तकें काढण्यास कंपनीनें प्रारंभ केला. १८८४ सालीं, कंपनीच्या सध्याच्या चेअरमनचे वडील मि. मॉरिस मॅकमिलन ह्यांनीं हिंदुस्थानांत दौरा काढून शिक्षण केंद्रांस भेटी दिल्या आणि प्रमुख पुस्तक विक्रेत्यांशीं संबंध जोडले. १८९३ सालीं ह्या कामासाठीं स्वतंत्र एजंटाची नेमणूक करण्यांत आली. १९०१ सालीं मुंबईची शाखा सुरू झाली. १९०३ सालीं तेथील मॅकमिलन बिल्डिंग पुरी झाली. कलकत्ता येथें १९०७ सालीं व मद्रास येथें १९१३ सालीं शाखा स्थापन केल्या. प्रत्यक्ष हिंदुस्थानांतच क्रमिक पुस्तकें आतां तयार करण्यांत येऊं लागलीं. लवकरच इंग्रजीबरोबर २० हिंदी भाषांतून मॅकमिलन कंपनीचीं पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं. कित्येक सुप्रसिद्ध ब्रिटिश प्रकाशक कंपन्यांचे सोल-एजंट म्हणूनहि मॅकमिलन आणि कं. काम पहाते. कंपनीच्या हिंदुस्थानांतील शाखांस गेल्या वर्षीच राइट ऑ. हॅरोल्ड मॅकमिलन, ह्यांनीं भेट दिली.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
☆ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ☆
९६ नारायण पेठ, पुणें २.

# पुणें घरभाडेकरी परिषद

## स्वागताध्यक्षः--श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एल्एल्. बी. यांचें स्वागतपर भाषण

रविवार, ता. २८ मार्च १९४८

गेल्या अधिवेशनाचे वेळीं भाडेकरूंना अत्यंत अनिष्ट असणारा कायदा क्षितिजावर येत होता. तो तसा आला असता तर धूमकेतुप्रमाणें त्यानें भाडेकरूंना सतावून सोडलें असतें. परंतु त्यावेळीं, पुणें, मुंबई, अहमदाबाद सारख्या शहरांतील भाडेकरूंनीं प्रचंड चळवळ केल्यामुळें वर तोंड काढणारा तो कायदा खालीं बसला, तेवढ्यापुरतें आमच्या अधिवेशनाला यश आलें परंतु पुनः सरकारनें पुण्याच्या अधिवेशनांत तो आणलाच व त्याचें स्वरूप पूर्वीचेंच मलिन होतें. त्या कायद्याचें वर्णन एकांनीं केल्याप्रमाणें भाडेकऱ्यांना संरक्षणाकरतां कायदा झाला परंतु त्याचें स्वागत मात्र घरमालकांनींच जास्त केलें; आणि त्यावेळची परिस्थिति खरोखरच तशी होती. भाडेकऱ्यांकडून जागा ताब्यांत देण्याच्या कारणांची जी ऐसपैस रेलचेल करण्यांत आली होती त्यामुळें नाममात्र कलमाचा आधार घेतला कीं, भाडेकरी घरांतून निघून जाण्याची शक्यता उत्पन्न झाली होती. असा कायद्याचा मसुदा जेव्हां प्रथम जाहीर झाला त्यावेळीं त्याच्यांविषयीं एकदम तिट-काराच उत्पन्न झाला. परंतु तेवढ्यानें भागणारें नव्हतें. सरकारी चाकोरींतून त्याला सुबक स्वरूप प्राप्त करून देणें जरूर होतें.

### नवीन कायद्याच्या घडणींत वांटा

पुणें घरभाडेकरु संघाचा गेल्या सालचा वृत्तांत विशेषतः याच गोष्टींनीं भरला आहे. मुंबईला भाडेकरूंच्या प्रचंड सभा झाल्या. लाखोंनीं लोक जमले. आम्हींहि तशी एक मोठी सभा घेतली. लोकांची गर्दी चांगली झाली व त्याचा परिणामही झाला. परंतु त्याहून हल्लींच्या घटनात्मक युगांत जी गोष्ट जास्त परिणामकारक होते ती म्हणजे कायदे बनविणाऱ्यांनाच भेटून त्यांना आपलें मत वादविवादांनीं अगर संभाषणाच्या ओघांत पटवून देणें ही होय. ती गोष्ट आम्हीं जास्त दक्षतेनें केली व त्यांत आम्हांला विशेष सहकार्य आपल्या पुण्याचे कायदेमंडळांतील प्रतिनिधी श्री. बाबा-साहेब घोरपडे यांचें झालें. त्यांनीं आस्थापूर्वक आमच्याकडून आमची बाजू समजून घेतली व ती जितक्या कसोशीनें मांडतां येईल तितकी मांडली. सिलेक्ट कमिटीवर ते नसल्यामुळें आमची कुचंबणा झाली परंतु इतर सभासदांनीं ती उणीव फारशी वाटूं दिली नाहीं.

### सिलेक्ट कमिटी

सिलेक्ट कमिटीच्या रचनेविषयीं जातां जातां एक उल्लेख करा-वासा वाटतो व तो म्हणजे या कमिटीवर पुणें, मुंबई, अहमदाबाद यासारख्या मोठमोठ्या शहरांतील प्रतिनिधींना विशेष स्थान मिळालें नाहीं. तालुका अगर जिल्हानिहाय निवडून आलेल्या प्रतिनिधींनाच तो मान मिळाला. सरकारच्या या धोरणामुळें जे प्रश्न शहरी जीवनांत पदोपदीं नडणारे आहेत ते या प्रतिनिधींना पटवून देण्यास फारच सायास पडले असल्यास आश्चर्य नाहीं. उदाहरणच द्यावयाचें झाल्यास वीज व नळाच्या पाणी पुरवठ्या-संबंधीं देतां येईल. वीज तोडणें व पाणी तोडणें हा घरमालकांचा भाडेकऱ्यांना छळण्याचा रामबाण उपाय होता. त्याच्यावर इलाज करण्यासाठीं आम्हीं संघाच्या स्थापनेपासून एकसारखी मागणी सर-कारकडे करीत आलों तरी कायद्याच्या मसुद्यांत त्यासंबंधीं कांहींच योजना आढळली नाहीं. त्यासाठी जेव्हां अनेक प्रयत्न झाले तेव्हां एकदां कुठें तें कलम कायद्यांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत प्रविष्ट झालें. सिलेक्ट कमिटीनें त्या मानानें पुष्कळच चांगली कामगिरी केली परंतु अशा कमिट्यांनीं यापुढें अमेरिकेंतील पद्धत अवलंबली व त्या त्या विषयांचा अभ्यास करणाऱ्या आमच्या सारख्या संघांना अगर तज्ज्ञांना जर आपल्या बरोबर काम करण्यास बोलावलें अगर त्यांचीं मतें समक्ष समजावून घेतलीं तर कायदा व व्यवहार यांची बरीच सांगड पडण्याजोगी आहे. यापुढील सिलेक्ट कमिट्यांची घडण व कार्यपद्धति वर सुचविल्याप्रमाणें झाल्यास हल्लीं प्रत्येक कायद्यास जी पुढील बैठकींत लगेच दुरुस्ती सुचवावी लागते ती लागणार नाहीं व जनतेचा खरोखरच अशा कायद्यां-पासून फायदा होईल.

### कायद्यांची प्रसिद्धी

सिलेक्ट कमिटीप्रमाणेंच सरकारच्या कायदा करण्याच्या पद्ध-तीविषयीं कांहीं विचार आपल्यापुढें मांडणें यावेळीं अप्रस्तुत होणार नाहीं. हल्लीचं आपलं सरकार हें जनतेचं आहे. जनतेला आपल्या हितासाठीं कोणते कायदे होतात हें आगाऊच कळणें अत्यंत जरूर आहे. जनतेनं आपले प्रतिनिधी कायदेमंडळांत पाठवून दिले असले तरी जनतेच्या सर्वच मतांचा त्यांना हवाला कधींही घेतां येणार नाहीं. जनतेचं कोणत्याही विषयासंबंधीं मत कळून घेण्याचं सरकारचं श्रेष्ठ कर्तव्य आहे. त्या दृष्टीनें प्रत्येक कायद्याचा मसुदा कायदेमंडळापुढें येण्यापूर्वी लोकांच्या पसंती-करतां गॅझेटमध्यें व शक्य झाल्यास नेहमींच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. हल्लीं तसा तो येत नाहीं. एवढेंच काय परंतु खुद्द कायदेमंडळांतील सभासदांनाही कोणत्या दिवशीं कोणता कायदा सभागृहापुढें मांडला जावयाचा आहे हें कळत नाहीं. ज्यांना कोणाला त्या कायद्याबाबत कांहीं सूचना कराव-याच्या असतील त्यांना यामुळें कांहींच सवड सापडत नाहीं, व बिल मांडणारांच्या एकांगी दृष्टीनुसार सर्व कायदा जनतेवर लादला जातो. निदान जे कायदे रोजच्या व्यवहारांतले आहेत, त्यांच्या बाबत तरी हा नियम कसोशीनें पाळण्याची खबरदारी सरकारनें घेणें जरूर आहे. या कायद्याच्या मसुद्याच्या वेळीं हीच धांदल झाली व मसुदा जर सिलेक्ट कमिटीपुढें मांडला गेला नसता तर त्यांत सुधारणा सुचविण्यास अवकाशच राहात नव्हता. तसेंच सरकारनें कायदा करतांना त्या त्या विषयाशीं संबंधित असलेल्या संस्थांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अशा संस्थांकडे त्या त्या विषयाचें सरकारी साहित्य नेहमीं पाठवीत राहिलें पाहिजे.

### कायद्याचीं सरकारी पुस्तकें

कायदा तयार होतांना जी परिस्थिति आढळते त्याचें ओझरतें दिग्दर्शन वर केलें आहे. आतां कायदा तयार होऊन तो छापून

लोकांचे हातांत पडण्याबाबत सरकारची पूर्वींचीच दिरंगाई व सनदी छाप कार्यपद्धति आढळून येते. जगांतच काय पण हिंदुस्थानांतही उत्तम उत्तम कागद व्यापारी पुस्तकांना व इतर व्यवहारांत वापरत असतांना आमच्या सरकारचें गॅझेट मात्र जास्तींत जास्त घाणेरड्या कागदावर छापलेलें आढळतें. त्यांतही एक्स्ट्रा ऑर्डिनरी गॅझेट काढून एकादा कायदा जाहीर केला तर त्याची प्रत खास वर्गणीदारांपर्यंत जाऊन पोचावयास दोन तीन आठवडे लागतात. हल्लींचा भाडें नियंत्रण कायदा १२ फेब्रुवारी १९४८ रोजीं लागू केल्याचें खास गॅझेट काढून जाहीर करण्यांत आलें; परंतु प्रत्यक्ष लोकांच्या हातांत हें एक्स्ट्रा ऑर्डिनरी गॅझेट पडायला २८–२९ फेब्रुवारी उजाडली. त्यानंतरही कायद्याचें पुस्तक मिळावयास आणखी एकादा महिना सहज जातो. सरकारनें ही बेंगरूळ पद्धति यापुढें अजिबात सोडून देऊन या सर्व बाबतींत व्यापारी तत्परता आणावयास पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे कायद्याबरोबरच कानू तयार करणें हें होय. कायदा ज्याप्रमाणें लोकमत अजमावण्याकरतां प्रसृत व्हावयास पाहिजे, त्याचप्रमाणें हे कानूही त्याचवेळीं तयार करून कायदा पसार झाल्याबरोबर व कानू करण्याचे अधिकार सरकारास मिळाल्याबरोबर जाहीर झाले पाहिजेत म्हणजे कायद्याची अंमलबजावणी सुसूत्र होण्यास सोईस्कर जातें.

### नागरी जीवनांत विजेचा पुरवठा

एकंदर कायद्याच्या चाकोरीसंबंधी जरी याप्रमाणें बरेचसें असमाधान असलें तरी अशाही प्रतिकूल वातावरणांतून जो कायदा तयार झाला आहे तो बराचसा समाधानकारक आहे. त्यांत अजूनही पुष्कळ ठेचा लागतील अशीं स्थळें आहेत, परंतु तीं सरकारच्या नजरेस आणून दूर करतां येण्याजोगीं आहेत. त्यासाठीच आजच्या सारख्या परिषदा वारंवार भरावयास पाहिजेत व त्यांतून आपल्याला हा कायदा कुठें नडतो, हें ठरवून सरकारच्या नजरेस आणून द्यावयास पाहिजे. पुष्कळ गोष्टी व्यवहारांत आपल्यास हरहमेश नडतात; परंतु त्या कायदे करणाऱ्यांच्या व्यवहारांत अडत नसल्यामुळें त्यांना त्या लौकर ध्यानांत येत नाहींत. दिसायला त्या क्षुल्लक दिसतात. परंतु दररोज मनस्ताप देण्यास त्या पुरेशा असतात. अशा गोष्टी वारंवार सरकारपुढें आणल्या पाहिजेत. शहरांतील वीज पुरवठ्याचाच प्रश्न घ्या. त्याबाबतही अजून पुष्कळ गोष्टी कायद्यानेंच व्हावयास पाहिजेत. पुण्यासारख्या ज्या ठिकाणीं विजेचा पुरवठा स्वस्त व मुबलक करता येणें शक्य आहे तेथेंही त्यांत अडचणी आहेत. सर्वांत मोठी अडचण म्हणजे भाडेकऱ्यास वीज पाहिजे असल्यास ती घरमालकाच्या परवानगीशिवाय घेतां येत नाहीं. घरमालकानें वीज घेण्यासाठी फिटिंग्स केलीं असलीं तरी वीज मात्र भाडेकऱ्यास मिळत नाहीं. पुष्कळदां मालक आपल्या जागेंत वीज वापरतो परंतु भाडेकऱ्यास ती देत नाहीं व त्याबाबत भाडेकऱ्यास कांहीं करतां येत नाहीं. अन्न पाण्याइतकेंच शहरी जिवनांत विजेच्या प्रकाशास व शक्तीस महत्त्व आहे. त्यांत या अशा अडचणी उत्पन्न होणें इष्ट नाहीं. त्यासाठी इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टमध्येंही जरूर ती दुरुस्ती करून घेण्याचे प्रयत्न करावयास पाहिजेत. या व अशा अनेक गोष्टी आपल्यास अजून करून घ्यावयाच्या आहेत. "काय करावें, कायदा नडतो" असें म्हणून डोक्याला हात लावून बसावयाचे दिवस गेले. कायदा नडत असेल व तो जनतेच्या प्रगतीच्या आड येत असेल तर तो बदलून घेण्यास आपण सर्वांनीं संघटित होऊन प्रयत्न केले पाहिजेत व कायदेमंडळांतील प्रतिनिधींना ते पटवून देऊन आपल्या हिताचा कायदा करून घेतला पाहिजे.


# दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली बँक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटींसाठीं चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल : | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर भांडवल : | रु. ४,१०,००० |
| अकूण खेळतें भांडवल : | रु. २,००,००,००० |

गतवर्षासाठीं बँकेनें शेअरवर पांच टके करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

—बँकेच्या शाखा—

डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट, गिरगांव व दादर), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे ऑफिस), नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर व कल्याण.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर.

## तेल गाळण्याच्या घाणींत सुधारणा

### तेल्यांची संघटना व हस्केल घाण्यांचा प्रसार

मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यानें खेडेगांवीं तेलाच्या धंद्याच्या सुधारणेसाठी १९३७ सालीं एक योजना तयार करून ती इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रि. रिसर्चकडे पाठविली. परंतु ती कौन्सिलच्या कक्षेंत येऊं न शकल्यामुळें, मुंबई सरकारनेंच स्वतःच्या खर्चानें तिला मान्यता दिली. ( १ ) यांत्रिक सुधारणा, ( २ ) रासायनिक संशोधन, ( ३ ) प्रत्यक्ष घाणीकामाच्या अनुभवाचें संकलन, अशी ह्या योजनेचीं तीन अंगें होतीं. त्यांपैकी रासायनिक संशोधनाचें काम होऊं शकलें नाहीं, कारण " ग्रामोद्योग प्रायोगिक वर्कशॉप"मध्यें रासायनिक लॅबोरेटरी नाहीं. सुधारलेल्या पद्धतीच्या घाण्यांबाबत अनेक प्रयोग केल्यानंतर हस्केल घाण्या व चालू कुलू घाण्याचें हस्केल घाण्यांत रूपांतर ह्याविषयक प्रात्यक्षिकांची योजना सरकारकडे धाडण्यांत आली. तिला १९४१ मध्यें मंजुरी मिळाली. पिढिजात तेल्यास ही घाणी देतांना, त्याचेकडून एक करारपत्र लिहून घ्यावें; तीन महिन्यांच्या अनुभवानंतर घाणी तेल्यास समाधानकारक व फायदेशीर वाटली, तर त्यानें ती निम्म्या किंमतीस विकत घेतली पाहिजे. ही निम्मी किंमत दरमहा ५ रु. च्या हप्त्यांनीं त्यानें सरकारास दिली पाहिजे, वगैरे अटी त्या करारपत्रांत असतात. तेल्यांच्या सोसायट्यांसहि वरील प्रकारच्या अटींवर हस्केल घाणी देण्याची योजनाहि सरकारनें सप्टेंबर १९४७ मध्यें मंजूर केली.

" ग्रामोद्योग प्रायोगिक वर्कशॉप " मध्यें पिढिजात तेल्यांसाठी एक महिन्याचे ट्रेनिंग क्लास चालविण्यांत येत आहेत. तेल्यांना उत्तेजन देण्याकरितां दरमहा २० रु. शिष्यवृत्ती व प्रवासखर्च (कमाल १० रु.) देण्यांत येत आहे. त्यांच्या राहाण्याचीहि सोय आहे. आतांपर्यंत ११५ तेल्यांचें शिक्षण पुरें झालें असून वेगवेगळ्या जिल्ह्यांत मिळून ५९ घाण्या बसविण्यांत आल्या आहेत. तेल्यांच्या घाण्या बसविण्यासाठी लाकडाचे ओंडे मिळण्यांत अडचण येते ती दूर व्हावी म्हणून असे ओंडे बाजूस काढून ठेवण्याची अट जंगल कंत्राटदारांवर बंधनकारक करावी अशी सरकारास विनंती करण्यांत आली आहे. सध्या १०० हस्केल घाण्या तयार होत आहेत आणि आणखी ३० घाण्याहि लवकरच पुऱ्या होतील बॉल बेअरिंगजच्या तुटवड्यामुळें वेळ लागला आहे.

भुइमूग, तिळ, इत्यादि गाळून त्यांचें तेल करण्याचा धंदा मुंबई प्रांतांत मोठ्या प्रमाणांत चालतो. एकूण उत्पादनाचे मानानें तेल्यांच्या खेडेगांवी घाण्यांचें उत्पादन अत्यल्प आहे; ह्या प्रांतांत एकूण २१६ ऑईल मिल्स असून खेडेगांवी घाण्यांची संख्या फक्त २०० आहे. तेल गाळण्यासाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग होऊं लागल्यापासून कित्येक तेल्यांना आपला पिढीजात धंदा सोडून द्यावा लागला. तेल्यांची सहकारी संघटना करून ह्या धंद्याचें पुनरुज्जीवन करतां येणें शक्य आहे. महाराष्ट्रांत पंढरपूर, खेड, घारेगांव व चांदवड येथें केंद्रें स्थापण्याबाबत योजना सरकारकडे गेलेल्या आहेत. गुजराथमधील तेलाच्या घाणींबाबत योजना स्वतंत्रपणें आंखण्यांत येत आहेत. कर्नाटकांत हिरेकुंबी येथें हा धंदा वाढविण्याची योजना सरकारनें मान्य केलेलीच आहे. वरील वृत्तांतावरून इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज आणि व्हिलेज इंडस्ट्रीजच्या जॉइंट रजिस्ट्रारांचें काम कसें खडतर असतें ह्याची कल्पना येईल. त्याचे सुपरिणाम दिसूं लागण्यास वेळ लागणें स्वाभाविकच आहे.

## कांहीं आयुर्विमा कंपन्यांचें नवीन काम

३१ डिसेंबर १९४७ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत मिळविलेलें काम


| | रुपये |
|---|---|
| हिंदुस्थान को- ऑपरेटिव्ह | १२,२५,७०,००० |
| न्यू इंडिया | ९,०४,१४,४५८ |
| नॅशनल | ६,७०,००,००० |
| बॉम्बे म्युच्युअल | ६,६०,८७,७५० |
| एम्पायर ऑफ इंडिया | ४,३८,००,००० |
| मेट्रोपॉलिटन | ४,१७,००,००० |
| लक्ष्मी | ४,११,००,००० |
| न्यू एशियाटिक | ३,५१,००,००० |
| बॉम्बे लाइफ | ३,०३,३१,३८७ |
| रूबी जनरल | २,७५,००,००० |
| इंडस्ट्रिअल ॲन्ड प्रूडेन्शिअल | २,३३,००,००० |
| वेस्टर्न इंडिया | २,२१,००,००० |
| एशियन | २,०१,००,००० |
| आंध्र | १,५०,००,००० |
| फ्री इंडिया | १,२८,८९,०८३ |
| कलकत्ता | १,१३,६०,००० |
| बॉम्बे को–ऑपरेटिव्ह | ४७,३०,६७७ |
| पाप्युलर | २८,६६,००० |
| वसन्त | ७०,००,००० |
| विक्रम | १३,००,००० |
| जयभारत | ६०,००,००० |
| कॅनरा म्युच्युअल | ६९,११०,५० |
| आर्गस | ११,३०,००० |
| दीपक | ४०,००,००० |
| दिग्विजय | ३८,००,००० |
| सेंट्रल मर्कन्टाइल | २२,५३,००० |
| युनियन | ५७,०२,१२५ |

( "विमा आणि व्यापार", मार्च १९४८ )

### श्री. साळवेकर ह्यांचेबद्दल दुखवटा

कंपनीचे प्रारंभीपासूनचे चेअरमन श्रीमंत ग. वि. (बाबुराव) साळवेकर यांचे मृत्युनिमित्त मे. विजय टेक्स्टाईल्स लि. यांनीं आपला कारखाना ता. २३ रोजीं बंद ठेवला होता. तसेंच स्थानिक डायरेक्टर मंडळीची सभा ता. २४ रोजीं सकाळीं भरवून दुखवट्याचा ठराव मंजूर करण्यांत येऊन तो त्यांचे कुटुंबियांकडे पाठवला.




हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
ए. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.